**ठळक बातम्या**

- धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २० हजार रुपये निधी २ हेक्टरच्या मर्यादेत देण्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत घोषणा
- २०२४ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर
- महाड परिसरात भीमसृष्टी उभारण्याची सामाजिक न्याय मंत्र्यांची घोषणा
- नागपूर हिंसाचार प्रकरणी फहीम खान याच्यासह ६ जणांविरुद्ध राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल

**आणि**

- देशातले शेअर बाजार महिनाभरातल्या उच्चांकी पातळीवर, सेन्सेक्स ७६ हजार, तर निफ्टी २३ हजार अंकांच्या वर बंद

**<><><><><>**

राज्यातल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २० हजार रुपये निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. जास्तीत जास्त २ हेक्टरसाठी हा निधी दिला जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केली. सोमवारी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं वित्त विभागाच्या अर्थसंकल्पीय अनुदानावरच्या मागण्यांना उत्तर देताना त्यांनी सांगितलं. शेतकरी कर्जमाफी संदर्भात माहिती गोळा करायचं काम सुरू आहे, असंही ते म्हणाले.

येत्या आर्थिक वर्षात १०० टक्के महसुल जमा करुन राज्याला आर्थिक शिस्त लावायची आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती पाहून मुख्यमंत्री माझी

लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवण्याचा निर्णय घेऊ याचा पुनरुच्चार त्यांनी केला. अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान काही सदस्यांनी तरतुदीच्या तुलनेत अतिशय कमी खर्च झाल्याचा आरोप केला होता. तो उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फेटाळून लावला....

**होल्ड - बाईट - अजीत पवार...**

लॉटरी आणि ऑनलाइन लॉटरीच्या माध्यमातून सरकारचे उत्पन्न वाढवण्यासाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणाही त्यांनी केली. अर्थसंकल्पातल्या वित्त, उद्योग, ऊर्जा, कामगार, खनिकर्म, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि नियोजन विभागाच्या अनुदानाच्या मागण्या आज विधानसभेत मंजूर करण्यात आला.

**<><><><><>**

२०२४ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केली. २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह, शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

१०० वर्ष वयाचे राम सुतार यांनी अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे आणि अनेक शिल्पं घडवली आहेत. केवडीया इथला स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा, मुंबईत इंदू मिल इथल्या स्मारकातला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, सिंधुदुर्गात राजकोट इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रस्तावित पुतळा यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणी नव्यानं चौकशी करावी, अशी मागणी भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी आज विधान परिषदेत केली. दिशा सालियन प्रकरणात एसआयटीची स्थापना झाली आहे, सीआयडीने याप्रकरणी क्लोजर रिपोर्ट दिला आहे. पण सत्ताधारी पक्ष या प्रकरणी सभागृहाचा वापर राजकीय हेतूसाठी करत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. सालियन प्रकरणात राजकारण होत असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब म्हणाले. यावेळी परब आणि भाजपाच्या चित्रा वाघ यांच्यात शाब्दिक चकमक उडाली.

राज्याचं कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण येत्या एप्रिल महिन्यात जाहीर होईल असं, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये CBSE चा अभ्यासक्रम सुरू होण्याची शक्यता आहे. या अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीनं मान्यता दिली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरात दिली. या आराखड्याच्या अंमलबजावणीसंदर्भात विचार विनिमय सुरू असल्याचं ते म्हणाले.

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार सुधारणा विधेयक कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज विधानपरिषदेत मांडलं. या नव्या कायद्यामुळे माथाडी कामगारांना कामगाराच्या व्याख्येतून वगळलं आहे, हा कायदा माथाडी कामगारांना उद्ध्वस्त करणारा कायदा असल्याची टीका काँग्रेस नेते भाई जगताप यांनी विधेयकावरच्या चर्चेत केली. हे विधेयक पुन्हा एकदा संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावं अशी मागणी त्यांनी केली. शशिकांत शिंदे यांनीही विधेयकावर आपलं मत मांडलं.

**<><><><><>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीच्या मुद्द्यावरून आज महाराष्ट्र विधानसभेत गदारोळ होऊन कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब झालं. दिशाच्या मृत्यूच्या एसआयटी चौकशीचा अहवाल त्वरित सादर करावा आणि सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचे आरोप तिच्या वडिलांनी काल केले होते. त्यातल्या आरोपींची चौकशी करावी, गरज असेल तर त्यांना अटक करावी अशी मागणी आमदार अमित साटम यांनी केली. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करू, असं आश्वासन गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलं.

**<><><><><>**

राज्यातल्या वाळू उपशाची परवानगी दिलेल्या सर्व ठिकाणांची विस्तृत पाहणी करून ज्या ठिकाणी परवानगी दिलेल्या हद्दीबाहेर जाऊन वाळू उपसा झाला आहे त्या ठिकाणी दंडासह वसुली केली जाईल असं आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिलं.

वाळू क्रशरसाठी एक खिडकी योजना सुरू करून ३ दिवसांत परवानगी दिली जाईल असं ते म्हणाले. सरकारनं नवं वाळू धोरण तयार केलं आहे, लवकरच त्याची अंमलबजावणी सुरू होईल, त्यासाठी शिफारशी मागवल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं.

गोहत्येचे गुन्हे वारंवार दाखल होणाऱ्या आरोपींवर मकोका लावण्याचे आदेश देऊ, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिले.

**<><><><><>**

राज्य विधीमंडळात पीठासन अधिकाऱ्यांकडून कामकाजात एकांगी आणि पक्षपाती भूमिका घेतली जात आहे, अशी तक्रार विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. विरोधी पक्षांना आणि पक्षनेत्यांना सभापती आणि अध्यक्षांकडून पक्षपाती वागणूक मिळत आहे. सभागृहात विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलू न दिल्यानं त्यांचा संवैधानिक हक्क डावलला जात आहे. त्यामुळे या प्रकरणात लक्ष घालून विरोधी पक्षांना न्याय मिळवून देण्याची विनंती दानवे यांनी राज्यपालांना केली आहे.

**<><><><><>**

महाड परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करण्याची घोषणा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज केली. ते आज महाड इथं चौदार तळे सत्याग्रहाच्या ९८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात बोलत होते. यासाठी लागणारा सर्व निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. तर, चौदार तळे सुशोभीकरणासाठी यापूर्वीच घोषीत झालेल्या ७ कोटी रुपयांची, तसंच राजर्षी शाहू महाराजांच्या स्मारकाची तीन कोटी रुपयांची कामं तातडीनं सुरू केली जातील, अशी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी घोषणा केली.

महाडमध्ये आज चौदार तळे सत्याग्रहाचा वर्धापन दिन लाखो भीम अनुयायांच्या उपस्थितीत सकाळपासूनच उत्साहात सुरू झाला. सकाळी साडेआठ वाजता चौदार तळ्याजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर रायगड पोलीस दलानं मानवंदना दिली. यावेळी हेलिकॉप्टर मधून चौदार तळे परिसरावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

**<><><><><>**

नागपूर दंगलींचा सूत्रधार फहीम खान याच्यासह ६ जणांविरोधात राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी फेसबुक, एक्स, यू ट्यूब आणि इतर समाजमाध्यमांवरच्या सुमारे २३० प्रक्षोभक पोस्ट आढळल्या आहेत, असं  सायबर सेलचे उपायुक्त लोहित मतानी यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

या दंगलीनंतर परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली होती. परिस्थितीचा आढावा घेऊन  नंदनवन, आणि कपिलनगर या पोलीस ठाण्याच्या हद्दीतली संचारबंदी पूर्णपणे उठवली आहे. तर लकडगंज, पाचपावली, शांतिनगर, सक्करदरा, इमामवाडा, आणि यशोधरानगर मधे दुपारी २ ते संध्याकाळी ४ या कालावधीत संचारबंदी शिथिल केली आहे.

**<><><><><>**

सातत्यानं होत असलेल्या तेजीमुळं देशातले शेअर बाजार महिनाभरातल्या उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. यामुळं गुंतवणुकदारांच्या उत्पन्नात १७ लाख ४३ हजार कोटी रुपयांची वाढ झाली.  गेल्या ४ दिवसात सुरू असलेल्या तेजीमुळे सेन्सेक्स अडीच हजारांनी वधारला आहे. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज दिवसअखेर ८९९ अंकांची वाढ नोंदवून ७६ हजार ३४८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २८३ अंकांची वाढ होऊन २३ हजार १९१ अंकांवर बंद झाला.

देशातल्या संस्थांत्मक गुंतवणूक दारांनी सुरू ठेवलेली खरेदी यामुळं बाजारात तेजी दिसून आल्याचं विश्लेषकांचं मत आहे. अमेरिकन फेडरल

रिझर्व्हनं व्याजदर कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे संमिश्र परिणाम जगभरातल्या शेअर बाजारात दिसून आले.

**<><><><><>**

आज जागतिक चिमणी दिन. निसर्गाच्या अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा घटक म्हणजे चिमणी. पण वाढतं शहरीकरण, प्रदूषण यांचा परिणाम चिमण्यांच्या संख्येवर होत असून हा पर्यावरणाच्या दृष्टीने धोका आहे.

**<><><><><>**

विदर्भात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे.

**//<><><><><>//**